पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस जि.सांगली

# वार्षिक अहवाल सन 2022—2023

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस या महाविद्यालयाचा सन 2022—23 या शैक्षणिक वर्षाचा अहवाल आपणापुढे सादर करीत आहे. समर्थ श्री. धोंडीराज महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पलूस नगरीत "तमसो मा ज्येतिर्गमय" हे ब्रीदवाक्य घेवून सन 1958 पासून कार्यरत असणा—या पलूस शिक्षण प्रसारक मंडळाने सन 1992 मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना केली. स्वर्गीय एस. के. पाटील व त्यांचे सहकारी यांचे कुशल मार्गदर्शन, प्रेरणा व प्रोत्साहन यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक कक्षा विस्तारत गेल्या. विद्यमान अध्यक्ष मा. रामचद्रं शंकरराव पाटील व सचिव मा.धोडीराम प्रताप शिंदे तसेच उपाध्यक्ष श्रीमती डॉ. आशाताई लक्ष्मणराव पाटील व प्रकाश हणमंतराव पुदाले, मॅनेजिंग कमिटी चेअरमन मा. एम.ए.पाटील, व्हा.चेअरमन मा. जयंतराव कदम व कार्यकारणीचे सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची संख्यात्मक, गुणात्मक वाढ होत आहे. सन 2022—23 मध्ये एम.एस्सी. रसायनशास्त्र अभ्याक्रमाची नव्याने सुरूवात झाली आहे.

महाविद्यालयाने स्थापनेपासून ग्रामीण भागातील विद्यार्थी घडविण्याकरिता सातत्याने प्रयत्न करून संख्यात्मक व गुणात्मक वाढीचा आलेख सतत वाढता ठेवला आहे. महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान बीबीए, बीसीए, बीसीएस, पीजीडीसीए या शाखाही कार्यरत आहेत. तसेच एम.ए.(इंग्रजी, अर्थशास्त्र), एम.कॉम.(अकौन्टसी) एम.एस्सी. (संगणकशास्त्र, प्राणीशास्त्र रसायनशास्त्र) हे पदव्युत्तर अभ्यासकम महाविद्यालयामध्ये सुरु आहेत. शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद तसेच कंपनी सेक्रेटरी हा कोर्स सुरू आहे. त्याचप्रमाणे यु.जी.सी. अनुदानाअंतर्गत 1) पीक संरक्षण 2)रेशीम उद्योग 3) घरगुती विद्युत उपरकणे दुरूस्ती 4) स्पोकन इंग्लिश 5). योगा ॲण्ड मिडीटेशन 6). टॅक्स प्रोसेजर 7). कॉम्प्यूटर हार्डवेअर ॲण्ड मेन्टेनस हे करिअर ओरिएटेड कोर्स सुरू आहेत.

सन 2022—23 या शैक्षणिक वर्षामध्ये एकूण **1704** विद्यार्थी शिक्षण घेत आहेत (त्यापैकी अनुदानित पदवीवर्गामध्ये मध्ये **1038** विनाअनुदानित पदवीवर्गामध्ये मध्ये **410** व पदव्युत्तर अभ्यासकमामध्ये 256 विद्यार्थी आहेत. दूरशिक्षण केंद्राअंतर्गत 30 विद्यार्थी प्रवेशित आहेत. त्याकरिता महाविद्यालयामध्ये 73 शिक्षक व 22 प्रशासकीय सेवक असे एकूण 95 कार्यरत आहेत.

## अविष्कार संशोधन स्पर्धा

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेत असताना संशोधनाची सवय लागावी त्यांच्या संशोधनाची आवड निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्राच्या राज्यपाल कार्यालयाचे आदेशाने महाविद्यालय पातळीवर अविष्कार संशोधन स्पर्धा घेतली जाते. भविष्यात विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करावी म्हणून ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. शैक्षणिक वर्ष 2022-23 या वर्षात आपल्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय विद्यापीठ व राज्यपातळीवर या स्पर्धेत सहभाग म्हणून उत्कृष्ट कामगिरी सह यश संपादन केले आहे. सुरुवातीला नऊ विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत श्रीमती मथुबाई गरवारे कन्यांमध्ये सांगली येथील सहभाग नोंदवला त्यामधील पाच संशोधक विद्यार्थी विद्यापीठ स्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाले ते विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत.

1.कुमारी अक्षता अशोक सूर्यवंशी बी.ए. भाग- एक, कला विभाग प्रथम

2.कुमारी आकांक्षा प्रवीण कुमार सुतार बी.एससी. भाग- तीन, विज्ञान विभाग प्रथम 3.कुमारी मनीषा सुरेश वडार बी.एससी. भाग - दोन, कृषी विभाग प्रथम

4.कुमारी सृष्टी निरंजन कदम बी.ए. भाग -२, वाणिज्य विभाग द्वितीय 5.श्री. अभिजीत अर्जुन कोळी बी.ए. भाग-तीन, कला विभाग द्वितीय

विद्यापीठ स्तरीय संशोधन स्पर्धेत कुमारी आकांक्षा प्रवीण कुमार सुतार विज्ञान विभाग व कुमारी अक्षता अशोक सूर्यवंशी कला विभाग यांनी अनुक्रमे प्रथम व तृतीय क्रमांक विद्यापीठ पातळीवर मिळवला आहे. तेव्हा या विद्यार्थिनींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी निवड झाली व त्यांनी या ठिकाणी सहभाग यशस्वीरित्या नोंदवला.

यानंतर राज्य पातळीवर झालेल्या या संशोधन स्पर्धेत कुमारी अक्षता अशोक सूर्यवंशी या विद्यार्थिनीच्या शेतकऱ्यांची अनुकरणप्रियता या संशोधन प्रकल्पास राज्य पातळीवर तिसरा क्रमांक मिळाला. सदर विद्यार्थीनिस रुपये 25000 फेलोशिप प्राप्त झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व संस्थेचे पदाधिकारी आणि प्राचार्य व प्राध्यापक यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले.

## कौशल्य विकास समिती

महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास समिती अंतर्गत विविध खालीलप्रामणे कोर्सेस सुरू करण्यात आले.
1. नंदी फाउडेशनचे महिंन्द्रा प्राईड – Employability skill training च्या एकणू 60 महिला विद्यार्थीनीच्या एकूण पाच बॅचेस ट्रेनिंग पूर्ण करण्यात आले आहे.

2. बजाज फिनसर्व – Personality Deveslopment च्या 60 विद्यार्थ्यांच्या एकूण पाच बॅचेस ट्रेनिंग पूर्ण करण्यात आले आहे.

3. स्कील डेव्हलपमेंट ऑफ इंडिया – जिल्हा उदयोग केंद्र सांगली यांचेमार्फत खालील कोर्स आयोजित करण्यात आले आहेत. या कोर्सेससाठी संपूर्ण महाविद्यालयातून एकूण 251 विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

A. Front Office Training.
B. Account Executive.
C. Hair Dressers and Stylist.
D. Beauty and fashion Designing.
E. Food Processing and Multi skill development.

यामुळे महाविद्यालयातील सरासरी 50 टक्के विद्यार्थ्यांनी या कौशल्य विकास कार्यक्रमांचा लाभ घेतलेला आहे.

## विद्यापीठ परीक्षा –

**महाविद्यालयातील सर्व विभागातील विषय शिक्षकांना टॉपिक टेस्ट व होमअसायन्मेंट घेण्यासंबंधीच्या सूचना देण्यात आली. तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विषय शिक्षकांनी ब्रिज कोर्स व बुध्दिमापन टेस्ट घेण्यासंबंधी सूचना देण्यात आली आहे. दि. 8/ 9/ 2022 रोजी नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय येथे सेमिनार झाले. सदर सेमिनारसाठी परीक्षा विभागाचे प्रो. डॉ. एस. वाय. शेषभरे सर उपस्थित होते. दि. 14/ 9/ 2022 रोजी त्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांना नवीन शैक्षणिक धोरणासंबंधीची माहिती दिली. दि. 16 सप्टेंबर 2022 रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणासंबंधीची सकाळी 9 ते 11 या वेळेत आर्ट्स व कॉमर्स या शाखेच्या विद्यार्थ्यांना व 12 ते 1 या वेळेत सायन्स व व्यावसायिक अभ्यासक्रम या शाखेच्या विद्यार्थ्यांचे वर्कशॉप घेऊन माहिती देण्यात आली. दि. 29/ 9/2022 रोजी Acadimc Bank of Crdit या संबंधीचे मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय सांगली येथे चर्चासत्र झाले. सदर चर्चासत्रास परीक्षा विभागाचे प्रो. डॉ. एस वाय शेषभरे सर उपस्थित होते. दि. 30/ 9/ 2022 रोजी ABC कार्ड काढण्यासंबंधी प्राध्यापकांचे वर्कशॉप**

घेण्यात आले.व त्यानंतर दि. 6/10/2022 रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ABC कार्ड काढण्यासाठी विद्यार्थ्यांना वर्गामध्ये जाऊन मार्गदर्शन करून त्यांचे कार्ड नंबरकाढण्यात आले.

तसेच सर्व विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पाचव्या सेमिस्टर साठी विद्यापीठ परीक्षा नुसार टर्मवर्क मार्क्ससाठी होमअसायमेंट , प्रोजेक्ट , ओरल घेऊन त्यांचे गुण विद्यापीठ पोर्टलमध्ये विषय शिक्षकांच्या कडून भरण्यात आले. तसेच प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पहिल्या सेमिस्टर साठी विद्यापीठ परीक्षानुसार टर्मवर्क मार्क्ससाठी असलेल्या होमअसायन्मेंट घेऊन त्याचे गुण विषय शिक्षकांनी विद्यापीठ पोर्टल वरती भरण्यात आले आहेत. तसेच सर्व विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेला स्वयंअध्ययन विषय 'भारतीय संविधान' या विषयाची परीक्षा 9/1/ 2023 रोजी घेण्यात आली तर सर्व विभागाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना असलेल्या Skill Enhancement Course (कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम) या विषयाची परीक्षा दि. 4/2/ 2023 रोजी महाविद्यालयाकडून घेण्यात आली. तर पदव्युत्तर विभागाची Skill Enhancement Course (कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम) या विषयाची परीक्षा विद्यापीठाकडून 28/ 3/ 2023 रोजी घेण्यात आली. या सर्व परीक्षेचे मार्क्स विद्यापीठ पोर्टल वरती भरण्यात आले. तसेच माननीय प्रधानमंत्री यांच्या ' परीक्षा पे चर्चा ' हा कार्यक्रम दि. 27/ 1/ 2023 रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे डी. डी. न्यूज, डी. डी नॅशनल या राष्ट्रीय वाहिनीवर प्रक्षेपण प्रसारीत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांच्या पर्यंत पोहोचण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार परीक्षा विभागामार्फत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ICT रूममध्ये दि. 27/ 1/ 2023 रोजी सकाळी 11.00 वा. प्रक्षेपण दाखवण्यात आले. सदर कार्यक्रमास 92 विद्यार्थी व महाविद्यालयातील काही शिक्षक उपस्थित होते. तसेच शैक्षणिक वर्ष 2022 - 23 या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या सर्व विभागाच्या द्वितीय, तृतीय व पदव्युत्तर विभागाच्या विद्यापीठ विद्यापीठ प्रथम सत्रातील परीक्षा विद्यापीठाकडून 2/1/2023 ते 21/2/ 2023 या कालावधीत घेण्यात आल्या. सदर परीक्षा महाविद्यालयात व्यवस्थितपणे पार पाडण्यात आल्या. त्याचप्रमाणे सर्व विभागातील प्रथम वर्षाचे विद्यार्थ्यांसाठी परीक्षा महाविद्यालयाकडून दिनांक 15/ 2/ 2023 ते 27/ 2 /2023 या कालावधीत घेण्यात आल्या. या परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व विषयाच्या प्रश्नपत्रिका महाविद्यालयातील विषय शिक्षकांच्या कडून काढून घेण्यात आल्या. तसेच सर्व विषयाच्या उत्तरपत्रिका संबंधित विषय शिक्षकांच्या कडून तपासून घेऊन त्याचे गुण विद्यापीठ पोर्टल वरती भरण्यात आलेले आहेत. तसेच विद्यापीठाच्या विविध क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी झाल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा झाली नाही. त्यांची परीक्षा घेण्याची सूचना विद्यापीठाने केल्यामुळे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची विद्यापीठ परीक्षा दि. 5/4/2023 ते 11/ 4/ 2023 या कालावधीमध्ये घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच द्वितीय सत्रातील विद्यापीठ परीक्षा विद्यापीठाने घोषित केल्या नंतर विद्यापीठाच्या सूचनेनुसार घेण्यात येतील .

## ग्रंथालय –

महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये आज अखेर 21923 ग्रंथ संख्या आहे. त्याच प्रमाणे या वर्षामध्ये 23 नियतकालिकांच्या वर्गणीसाठी 30500/–रू. खर्च करण्यात आले.

• **मुक्तद्वार पध्दत**– विद्यार्थ्यांना आपणास हवे असणारे पुस्तक स्वतः पाहून घेण्यासाठी ग्रंथालयात मुक्तद्वार पध्दत वापरली जाते.

• विद्यार्थ्यांना चालू घडामोडी समजण्यासाठी ग्रंथालयामध्ये वर्तमानपत्रे घेतली जातात.

• ग्रंथालयासाठी स्वतंत्र नविन इमारत आहे. ग्रंथालयामध्ये प्राध्यापक व विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करण्यात आलेली आहे.

• **ग्रंथालय दिन**–दि.12/8/2022 रोजी ग्रंथालयाचे जनक डॉ. एस.आर.रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे, नॅक चे प्रमुख डॉ. पी.एम. पाटील, सायन्स विभाग प्रमुख डॉ. एस.एस. पाटील, प्रा.सौ.एन.एस.पाटील, प्रा.सौ.एस.एस.पाटील, प्रा. आर.बी.जाधव, प्रा. डी. व्ही.पाटील प्रा.सुनिल पाटील, ग्रंथपाल एस.डी.माने व श्री घनांजी पाटील उपस्थित होते.

• **वाचन कट्टा** –विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून दि. 15 ऑक्टोंबर 2022 रोजी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन कट्टा घेण्यात आला.त्या वेळी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे शाहिर श्री.काकासाहेब देशमुख, यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एस. साळुंखे, डॉ. पी.एम.पाटील, डॉ.एस. आर पार्लेकर, प्रा. श्री. भाट डी.व्ही. डॉ. सौ.संगिता एस.पाटील, कार्यालयीन अधीक्षक श्री.एन.के.शिंदे, ग्रंथपाल श्री.एस.डी. माने इत्यादी उपस्थित होते.

• **महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट**–

दिनांक 7/3/2022 रोजी वारणा महाविद्यालयाच्या ग्रंथपाल यांनी भेट दिली
16/9/2022 रोजी गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे खजिनदार श्री. गोंविद डुबल (नाना) यांनी ग्रंथालयास सदिच्छा दिली.

16/9/2022 रोज क्रांतीअग्रणी जी .डी. बापू लाड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. ए.पाटील, डॉ.वाघमारे बी.डी., डॉ. चावरे एस.जी. ग्रंथपाल किशोर देसाई, श्री. गायकवाड पी.एन. यांनी ग्रंथालयास सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ग्रंथपाल श्री.एस.डी.माने व ग्रंथालय परिचर कुमार वायदंडे उपस्थित होते.

• समीक्षक प्रा.रा. श्री. जोगः एक अभ्यास लेखक प्राचार्य डॉ. डी.डी. मगदूम हे पुस्तक श्री. संजीव धनपाल मगदूम यांनी प्रा. भाट डी. व्ही यांच्या मार्फत महाविद्यालयास भेट देण्यात आले त्यावेळी प्राचार्य डॉ. आर.एस. साळुंखे, आयक्युएसी प्रमुख डॉ.पी.एम. पाटील व ग्रंथपाल श्री. एस.डी.माने उपस्थित होते.

• **ग्रंथ प्रदर्शन**

१. दिनांक १५/९/२०२२ रोजी महाविद्यालयामधील अर्थशास्त्र विभाग, आयक्यूएससी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संमुक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.

२. दि. २६/११/२०२२ रोजी रसायनशास्त्र विभागाकडील पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले.

३. दि. ७/१२/२०२२ रोजी बेस्ट बुक्स सेलर्स, कोल्हापूर यांच्या मार्फत सर्व विषयांच्या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.

४. दि. १५/१२/२०२२ रोजी गणित विषयांच्या पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले.

५. दि. ४/१/२०२३ रोजी वनस्पतीशास्त्र या विषयांच्या पुस्तकांचे ग्रंथप्रदर्शन घेण्यात आले.

**• दि. २७/९/२०२२ रोजी मिरज महाविद्यालयातील सेवानिवृत प्राध्यापक विनोद बेसगावकर यानी कागदपत्रे व नाणी संकलन केलेले आहे. ते कागद पत्रे व नाणी यांचे प्रदर्शन महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये भरविण्यात आले त्यावेळी मा. प्राचार्य डॉ.आर.एस.साळुंखे यांच्या हस्ते प्राध्यापक विनोद बेडसगावकर याचे स्वागत करण्यात आले. त्यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थ्यांनी सदर प्रदर्शनाचा लाभ घेतला**

**विद्यार्थ्यांना ग्रंथालयाबाबत केलेले मार्गदर्शन**

१. दि. २९/०९/२०२२ रोजी हिंदी विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी ग्रंथालय भेट दिली तेव्हा त्यांना ग्रंथालयाची माहिती सांगण्यात आली.

२. दि. २९/०९/२०२२ रोजी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट झाली तेव्हा ग्रंथालयाची माहिती देण्यात आली.

३. दि. १/१०/२०२२ रोजी राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट झाली तेव्हा ग्रंथालयाची माहिती देण्यात आली

४. दि. १३/१०/२०२२ रोजी एम.कॉम भाग १ विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट झाली तेव्हा ग्रंथालयाची माहिती देण्यात आली

५. दि. २९/११/२०२२ रोजी एम.कॉम भाग २ विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची ग्रंथालय भेट झाली तेव्हा ग्रंथालयाची माहिती देण्यात आली

६. दिनांक २४/९/२०२२ रोजी स्वच्छता मोहिम राबविण्यात आली त्यामध्ये सहभाग

७. दि. ७ सप्टेंबर २०२२ रोजी माहविद्यालयामध्ये सांगली जिल्हा युवक महोत्सव शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने महाविद्यालयामध्ये एक दिवशीय कार्य शाळा आयोजित करण्यात आली त्या कार्यशाळेस उपस्थितीतांची नोंदणी सर्टिफिकेट वाटप करणे इ. कामे करण्यात आली.

८. महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या प्रश्नपत्रिका व एसआरपीडी कडून उपलब्ध झालेल्या प्रश्नपत्रिकांचे डिजिटल स्वरूपात तयार केलेले आहेत त्याचा QR कोड तयार केला आहे. त्याच प्रमाणे त्याची लिंक सुध्दा तयार केलेली आहे. सदर लिंक व कोड विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे. कोडची प्रिंट मारून नोटीस बोर्डला लावण्यात आली आहे. त्याचा नमुना सोबत जोडलेला आहे.

९. आपल्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पलूस मार्फत शुक्रवार दिनांक 16/6!2023 रोजी 'युज ऑफ इंन्फिलबनेट ॲण्ड लायब्ररी फॉर कॉम्पेटेटिव्ह एक्झाम' या विषयावर एक दिवशीय राज्यस्तरीय कार्यशाळा आयेजित करण्यात आली सदर कार्यशाळेसाठी इंन्फिलबनेटचे प्रमुख उपक्रम ( Infilbnet : Major Activites) या डॉ. सुधिर नगरकर ग्रंथपाल आमदार शशिकांत शिंदे महाविद्यालय मेढा यांचे मार्गदर्शन लाभले. तर 'स्पर्धा परीक्षेच्या तयारी साठी ग्रंथालयाचा वापर ( "Use of Library for Preparation of Competitive Exaxs") या विषयावर श्री. अतुल नगरकर ग्रंथपाल दूध साखर महाविद्यालय बिद्री ता. कागल जि. कोल्हापूर यांचे मार्गदर्शन लाभले. सदर कार्यशाळेसाठी 943 व्हीवज मिळालेत.

१०. 13/4/2023 रोजी राज्यशास्त्र विभागाकडील भाग तीन मधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शल करण्यात आले.

११. १४/४/२०२३ रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. त्या वेळी डॉ. बाबासाहेब यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरवीण्यात आले.

१२. मे २०२३ मध्ये प्रवेश उत्सवामध्ये सहभाग घेण्यात आला.

# जिमखाना

सन 2022–23 या शैक्षणिक वर्षात विविध खेळ प्रकारात खेळाडूंनी भरघोष यश मिळविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कीडा स्पर्धेत प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही खेळ / स्पर्धा मध्ये आपल्या खेळाडूंनी भाग घेतला. तसेच काही उपक्रम राबविण्यात आले आहेत.

1.राष्ट्रीय कीडा दिन : मेजर घ्यानचंद जन्मदिवस – 29 ऑगस्ट 2022 रोजी राष्ट्रीय कीडा दि स्टेडियमवर उत्साहात संपन्न झाला. मे ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पूजन करून माजी खेळाडू व आजी खेळाडू यांच्यात सॉप्टबॉल चा प्रदर्शनीय सामना घेण्यात आला

2. फिल्ड क्लिनींक – सॉप्टबॉल – दिनांक 03.09.2022 रोजी महाविद्यालयाचे माजी खेळाडू व नवोदय विद्यालय मडगाव गोवा चे कीडा शिक्षक श्री विनायक जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सॉप्टबॉल या कीडा प्रकारामधील नियम, नवीन बदल, व्यायाम, व संघाची तयारी, शिस्त इत्यादीबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

3.कीडा मानसशास्त्र कार्यशाळा – श्री अजित पाटील एम.डी.च्लबीवसवहपेज नवोदय विद्यालय मडगाव गोवा यांच्या मार्गर्शन व कार्यशाळा खेडाडूसाठी घेण्यात आली.

3. जनरल फिजीकल फिटनेस ाव टेनिंग कॅम्प– महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थीनींकरिता दिनांक 22.09.2022 ते 30.09.2022 एकूण आठ दिवस सदर कॅम्प घेण्यात आला आहे.

**सन 2022–2023 या वर्षात सर्वात जास्त 10 खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधित्व केले आहे.**

A) AIU – अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेळाडू व गुणवत्ता– सॉप्टबॉल चंदिगड (पंजाब)

स्पर्धेत खेळाडू ना रौप्य पदक प्राप्त झाले आहे.

1.कु.पाटील वेदश्री रजिंत – बी.कॉम. भाग– 3 – रौप्य पदक

2.कु.कदम श्रुती निरंजन – बी.ए. भाग–2 – रौप्य पदक

3.कु. कांबळे निरूपमा तात्यापा – बी.कॉम. भाग–2 – रौप्य पदक

4. श्री लाड कृणाल प्रमोद–बी.ए.भाग– 3 – सहभाग

5.श्री पवार अभिजित शिवाजी – बी.ए.भाग–3 – सहभाग

B) AIU – अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेळाडू व गुणवत्ता– बेसबॉल –गुवाहटी, आसाम

1.कु.पाटील निकिता अरूण – एम.कॉम. भाग–2 सहभाग

2. कु.पाटील वेदश्री रजिंत – बी.कॉम.भाग– 2 – सहभाग

3.श्री बाबर रोण ज्ञानदेव –बी.एस्सी.भाग–1 –सहभाग

4.श्री कुराडे योगेश विकास – बी.ए.भाग–3 – सहभाग

5.श्री चाटे प्रतिक सुभाष – बीसीए– भाग–2 – सहभाग

<u>शिवाजी विद्यापीठ सांगली विभागीय स्पर्धेतील यश</u>

बॉक्सीग – 1. श्री माळी मंगेश चंद्रकांत – बी.एसी. भाग– 2 द्वितीय कमाक

2.श्री खटावकर अथर्व अजिल्य – बी.एसी. भाग– 1 द्वितीय कमाक

3.श्री पाटील हर्षवर्धन चंद्रकांत – बी.ए.भाग– 1 द्वितीय कमाक

हॉलीबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व प्रथम कमांक

स्पॉप्टबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व प्रथम कमांक

बेसबॉल – पुरूष संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व व द्वितीय कमांक

बेसबॉल – महिला संघ – विभागीय स्पर्धेत सहभाग व – प्रथम कमांक

कुस्ती – पुरूष संघ – श्री मारे प्रसाद सुनिल – तृतीय कमांक

– श्री माने सुयश कृष्णा – तृतीय कमांक

– श्री पाटील विवके कृष्णा – द्वितीय कमांक

वरील सर्व संघ आंतरविभागीय स्पर्धेत पात्र ठरले आहेत.

<u>शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय स्पर्धेतील यश</u>

बेसबॉल – पुरूष संघ – <u>आंतरविभागीय</u> स्पर्धेत सहभाग व द्वितीय कमांक

सॉप्टबॉल – महिला संघ – <u>आंतरविभागीय</u> स्पर्धेत सहभाग व द्वितीय कमांक

बेसबॉल – महिला संघ – <u>आंतरविभागीय</u> स्पर्धेत सहभाग व द्वितीय कमांक

प्रतीवर्षीप्रमाणे महाविद्यालयामध्ये आंतरवर्गीय कीडा स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना गोरविण्यात येणार आहे.

## सांस्कृतिक –

सन 2022-23 या शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक विभागाच्या वतीने वेगवेगळ्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले त्याचा अहवाल खालील प्रमाणे------

१) दि.१/८/२०२२

लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे मॅनेजिंग कमिटीचे व्हाईस चेअरमन श्री. जयंत कदम यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले .यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर एस साळुंखे सर व सर्व प्राध्यापक विद्यार्थी हजर होते.

२)दि.१३/८/२०२२

आजादी का अमृत महोत्सवानिमित्त "स्वातंत्र्यवीरांचे विचार व स्वातंत्र्याचा इतिहास प्रचार व प्रसार" या विषयावर भित्तिपत्रकाचे उद्घाटन डॉक्टर पीएम पाटील व श्री जयंत कदम यांच्या हस्ते झाले.

३)१५/८/२०२२

भारतीय स्वातंत्र्य दिन सोहळा (आजादी का अमृत महोत्सव) या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे माननीय श्री .जे. के .बापू जाधव (संस्थापक मानसिंग को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड दुधोंडी )यांच्या प्रमुख उपस्थितीत व श्री .राहुल जाधव भारतीय सेना दल (माजी विद्यार्थी) कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र शंकरराव पाटील अध्यक्ष,( पलूस शिक्षण प्रसारक मंडळ, पलूस( यांच्या उपस्थितीत संपन्न झाला .या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. संगीता पाटील ,आभार श्री. सावंत मुख्याध्यापक ल.की विद्यामंदिर पलूस व सूत्रसंचालन प्रा. भाट डी. व्हि. यांनी केले.

४)दि.२१/८/२०२२

महाविद्यालयाचा ३०वा वर्धापन दिन व माजी विद्यार्थी मेळावा सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. उमेश कुमार पाटील (अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघटना )पलूस .यावेळी श्री.धोंडीराम शिंदे ,सचिव , पलूस शिक्षण प्रसारक मंडळ ,पलूस यांची उपस्थिती होती. पाहुण्यांचा परिचय डॉ.संगीता पाटील व आभार डॉ. एस .डी. पवार व सूत्रसंचालन डॉ. संगीता पाटील व श्री भाट. डी .व्ही यांनी केले. यावेळी डॉ.पी .एम .पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

५)दि.७/९/२०२२

शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर (विद्यार्थी विकास विभाग) व कला ,वाणिज्यव विज्ञान महाविद्यालय, पलूस यांच्या संयुक्त विद्यामाने 'युवा महोत्सव माहिती एक दिवशीय कार्यशाळा' (सांगली जिल्हास्तरीय) संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख उद्घाटक मा. प्राचार्य, डॉक्टर प्रताप पाटील (वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द) ख प्रमुख पाहुणे ,डॉ. आर. व्ही. गुरव( संचालक विद्यार्थी विकास विभाग, कोल्हापूर )प्रमुख उपस्थिती ,मा. श्री. निलेश सावे (सांस्कृतिक विभाग ,समन्वयक मुंबई विद्यापीठ, मुंबई )अध्यक्ष .श्री रामचंद्र पाटील (अध्यक्ष, पलूस शिक्षण प्रसारक मंडळ ,पलूस )यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ.आर .एस. साळुंखे( प्राचार्य )यांनी केले पाहुण्यांचा परिचय डॉ. संपतराव पार्लेकर व आभार डॉ.संगीता पाटील यांनी केले.

६)दि.२७/९/२२-१/१०/२२

सांस्कृतिक विभाग व महिला कल्याण विभागाच्या वतीने 'नवरात्र उत्सव 2k22' या कार्यक्रमांतर्गत रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व ,भित्तीपत्रक, पुष्परचना, गरबा, हदगा, क्राफ्ट फेस्टिवल इत्यादी स्पर्धांचे आयोजन यशस्वीपणे पार पडले.

७)दि.१२/१०/२०२२

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, (विद्यार्थी विकास ,विभाग )यांच्या वतीने 42 वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव श्री. व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ सायन्स, पेठ येथे संपन्न झाला यामध्ये आपल्या महाविद्यालयातील 11 मुले व 19 मुली असे एकूण 30 विद्यार्थी सहभागी झाले होते. एकूण 10 स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. 1)प्रश्नमंजुषा 2)वक्तृत्व 3)वादविवाद4) सुगम गायन 5)समूहगीत6) लोककला 7)पथनाट्य 8)लघुनाथिका9) वाद्य वृंद10) मूकनाट्य यामध्ये एकूण 2 क्रमांक प्राप्त झाले. लोककला- प्रथम क्रमांक- 1)देशमुख वैष्णवी वासुदेव2) कदम भक्तीप्रिया भगवान 3)काकतकर राधिका शशिकांत 4)राडे सानिका सुनील5) मोरे तमन्ना दिलीप 6)पाटील पूजा जालिंदर 7)आवटे तनुजा दिलीप 8)गोतपागर संकेत जीवन9) पवार आदित्य नितीन10) साथिदार-सोमोशी आरती हरिभाऊ सुगम गायन- प्रथम क्रमांक- कोकळे स्वप्निल रमेश

८)दि.१६,१७,१८/१०/२०२२

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (विद्यार्थी विकास विभाग) व श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय ,आटपाडी येथे 42 वा मध्यवर्ती युवा महोत्सव संपन्न झाला ,यामध्ये आपल्या महाविद्यालयातील ४ मुलीव १० मुले यांनी सहभाग घेतला. एकूण ६ स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. त्यामध्ये दोन क्रमांक मिळाले सुगम गायन- प्रथम क्रमांक- कोकळे स्वप्निल रमेश, लोककला- उत्तेजनार्थ द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

९)दि.७-९/११/२०२२

महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ "इंद्रधनुष्य 2022- 2023 युवा महोत्सव "महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे संपन्न झाला. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील एक प्राध्यापक व दोन विद्यार्थी सहभागी झाले.

डॉ. संगीता संपत पाटील- टीम मॅनेजर

१)कोकळे स्वप्निल रमेश -प्रथम क्रमांक वेस्टर्न ग्रुप ग्रुप सॉग

२)समोशी आरती हरिभाऊ- ० फोक आर्केस्ट्रा ( वाद्य वृंद)- तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

१०)१९/११/२०२२

अंतर्गत तक्रार निवारण समिती, IQAC व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "कायदे व त्याची अंमलबजावणी" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले .यावेळी प्रमुख पाहुण्या व वक्त्या मा. राजश्री दुधाळ( पी एस आय पलूस पोलीस स्टेशन ,पलूस) यांनी मार्गदर्शन केले.

११)२८/११/२०२२

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी निमित्त श्री. माधव पाटील (सीनियर क्लार्क, पलूस) यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन झाले. यावेळी प्राचार्य डॉ. आर एस साळुंखे यांनी ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा आढावा घेतला आणि आभार डॉ. संगीता पाटील यांनी मांडले.

१२)दि.६/१२/२०२२

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन व क्रांतिसिंह नाना पाटील स्मृतिदिन महाविद्यालयात संपन्न झाला. प्रमुख वक्ते कॅप्टन डॉ.एस एम कांबळे (भूगोल विभाग )हे होते. अध्यक्ष प्राचार्य डॉ.आर एस साळुंखे यांनी भूषवले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक भाट डी. व्ही .आभार प्राध्यापक घाटगे यांनी केले. यावेळी मेहरूनीसा बडीगैर व शीतल माने या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले.

१३)दि.१०-१४/२/२०२३

पश्चिम विभागीय युवा महोत्सव, 2022 -23 गणपत युनिव्हर्सिटी, मेहसाणा ,गुजरात येथे एका विद्यार्थ्यांची निवड झाली १)स्वप्निल रमेश कोकळे वेस्टर्न वेस्टर्न ग्रुप सॉग- तिसरा क्रमांक मिळाला

२)इंडियन ग्रुप सॉग- चौथा क्रमांक मिळाला.

१४)दि.२६-१७/२/२०२३

राष्ट्रीय कवाली स्पर्धा -शारदा विद्यापीठ, नोएडा (उत्तर प्रदेश) येथे स्वप्निल रमेश कोकळे या विद्यार्थ्याची निवड झाली.

१५)दि.२-५/१/२०२३

राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा "उत्कर्ष 2022 23 "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे एका विद्यार्थिनीची निवड- कुमारी सानिका सुनील राडे

१६)दि.१२/१/२०२३

स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली .यावेळी डॉ. पी .एम. पाटील व कुमारी अश्विनी माळी अ भा .वी .प.सदस्य( विलिंग्डन महाविद्यालय , सांगली यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक भाट डी .व्ही. आभार डॉ. संगीता पाटील यांनी मांडले.

१७)दि.२३/१/२०२३

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त नायब सुभेदार विनोद पाठक( एन .सी .सी. बटालियन, सांगली) यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन केले .यावेळी या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक भाट डी.व्ही व आभार डॉ. संगीता पाटील यांनी केले यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर एस साळुंखे व इतर प्राध्यापक व विद्यार्थी हजर होते.

१८)२५/१/२०२३

राज्यशास्त्र विभाग, सांस्कृतिक विभाग व एन. एस .एस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "राष्ट्रीय मतदार दिन "महाविद्यालयात साजरा केला. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार जागृती शपथ कॅप्टन डॉ.एस .एम .कांबळे यांनी दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आर .बी .जाधव यांनी केले व मतदार जागृती रॅली काढण्यात आली .

१९)दि.२६/१/२०२३

74 वा प्रजासत्ताक दिन सोहळा संस्थेच्या प्रांगणात साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड.नितीन कोळेकर (सांगली) हे होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री .ए .एस. सावंत( मुख्याध्यापक ल .की. विद्यामंदिर, पलूस) व आभार यांनी मांडले .यावेळी वेगवेगळे सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करण्यात आले.

२०)३०/१/२०२३

महात्मा गांधी पुण्यतिथी व देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राण अर्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्धता पाळून आदरांजली वाहण्यात आली .महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन प्रा. डी .एन. कलंगे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस .साळुंखे यांनी आभार मानले.

२१)दि.२४-२८/२/२०२३

राष्ट्रीय युवा महोत्सव 2022 -23 दिनांक 24 ते 28 फेब्रुवारी 2023 या कालावधीत जैन युनिव्हर्सिटी ,बेंगलोर ,कर्नाटक येथे आयोजित केला .या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी- कोकळे स्वप्नील रमेश याची निवड झाली १)वेस्टर्न ग्रुप सॉंग - प्रथम क्रमांक २)रॅली- प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

२२)८/३/२०२३

I Q A C ,सांस्कृतिक विभाग व महिला कल्याण विभागामार्फत जागतिक महिला दिनानिमित्त "माझी आई माझ्या महाविद्यालयात" या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .यावेळी 'सक्षमा' हा पुरस्कार व 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२३)२१ /०३/२०२३

छत्रपती संभाजी महाराजांची पुण्यतिथी महाविद्यालयात साजरी केली .यावेळी प्रा. काळे .एस. एच. यांनी संभाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला. युवा व्याख्याता श्री. अभिजीत कोळी यांनी संभाजी महाराजांच्या वर व्याख्यान दिले. प्राचार्य डॉ.आर. एस .साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. संगीता पाटील यांनी मांडले.

२४)११/४/२०२३

महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मा. श्री .संदीप पाटील (प्रोफेशनल विभाग) यांनी प्रतिमेचे पूजन करून साजरी केली .सर्व विद्यार्थी व प्राध्यापक हजर होते.

२५)१४/०४/२०२३

डॉ.बाबासाहेब आबेडकर जयंती निमित प्रतिमा पूजन व ग्रथ प्रदषण करण्यात आले आहे

२६)२६/०४/२०२३

लघूचित्रपट निर्मिती एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळा घेणेत आली. यामध्ये श्री. जलालूउददीन बाबा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी केले

27) 08.05.2023 ते 10.09.2023

कृ. सुप्रिया प्रकाश पाटील  या विद्यार्थीनीची नेतृत्व विकास शिबीर 2022–23  बहाई ॲकॉडमी पाचगणी येथे निवड व सहभाग

28) 20.05.2023

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ या कार्यक्रमाचे  प्रमुख पाहुणे श्री वैभवराव सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी,सदस्य उपस्थित हाते.

## राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचे मन मनगट व मेंदू कार्यक्षम होण्यासाठी व राष्ट्रीय दृष्टी निर्माण होण्यासाठी स्वच्छ व स्वस्थ भारत निर्माण करण्यासाठी श्रमसंस्कार, मूल्य शिक्षण व व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना 1995- 96 पासून सुरू करण्यात आली सध्या दोनशे विद्यार्थी योजनेत कार्यरत आहेत.

राष्ट्रीय सेवा योजनांचा या वर्षाचे उपक्रम

1.दिनांक 1 ऑगस्ट 2022 रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली

2.दिनांक ८ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान हर घर तिरंगा साजरा करण्यात आला या दिवसाच्या औचित्य साधून समोर राष्ट्रगीत गायन करण्यात आले

3.दिनांक 9 सप्टेंबर 2023 रोजी जागतिक साक्षरता दिवस साजरा करण्यात आला

4.दिनांक 24 सप्टेंबर 2023 रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला

5.दिनांक १ ऑक्टोबर २०२२ रोजी स्वच्छता दिनानिमित्त जनजागरती व जिल्हा परिषद शाळा सावंतपूर या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता व स्वच्छता शपथ घेण्यात आली

6.दिनांक 2 ऑक्टोबर 2022 रोजी गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली

7. दिनांक 15 ऑक्टोबर 2022 रोजी डॉ. ए.पी.जे कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली

8.दिनांक 18 ऑक्टोबर 2022 रोजी स्वच्छ भारत प्लास्टिक मुक्त भारत या संकल्पनेवर आधारित बस स्टॅन्ड स्मशानभूमी व शासकीय रुग्णालय या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली गेली

9.दिनांक 31 ऑक्टोबर 2022 रोजी सकाळी एकता दिन व इंदिरा गांधी पुण्यतिथी साजरी करण्यात आली या दिवसाचे अवचित्य साधून सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व एकता दौड आणि एकता शपथ घेण्यात आली यात सर्व स्वयंसेवक विद्यार्थी शिक्षक यांनी सहभाग नोंदवला

10.दिनांक 07 नोव्हेंबर 2022 रोजी राष्ट्रीय कर्करोग जागृती दिन व राष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला यावेळी ग्रामीण रुग्णालयातील प्रमुख डॉक्टर पथकाने विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

11.दिनांक 14 नोव्हेंबर 2022 रोजी बालदिन साजरा करण्यात आला यावेळी जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

12.दिनांक 26 नोव्हेंबर 2022 रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला यावेळी श्री मारुती शिरतोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या दिवसाचे औचित्य साधून संविधान प्रतिज्ञा, भिंतीपत्रक, रांगोळी इत्यादी उपक्रम घेण्यात आले.

13.दिनांक 01 डिसेंबर 2023 रोजी जागतिक एड्स दिवस साजरा करण्यात आला यानिमित्ताने जनजागृती फेरी भिंती पत्रक यांच्या आयोजन करण्यात आले

14. दिनांक 15 जानेवारी 2023 रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला यावेळी प्रभात फेरी व मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली.

15. दिनांक 19 फेब्रुवारी 2023 रोजी शिवजयंती साजरी करण्यात आली या दिवसाचे अवचित्य साधून किल्ले मच्छिंद्रगड या ठिकाणी स्वच्छता मोहीम सूचनाफलक व वृक्षारोपण करण्यात आले.

16. दिनांक 14 एप्रिल 2023 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची तर जयंती साजरी करण्यात आली यानिमित्त निबंध चित्रकला स्पर्धा व पुस्तक प्रदशणाचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर

मंगळवार दिनांक 28 फेब्रुवारीपासून सोमवार दिनांक 6 मार्च 2023 पर्यंत सावंतपूर दत्तक गावी विशेष संस्कार शिबिर संपन्न झाले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी माननीय श्री प्रल्हाद जाधव सरपंच सावंतपूर व माननीय श्री विकास मानसिंग जाधव उपसरपंच प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर संस्थेचे सर्व पदाधिकारी व सर्व संचालक तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते यावर्षी शिबिरे युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास असून या संकल्पनेवर आधारित अनेक उपक्रम राबविण्यात आले तसेच महिला विकास सबलीकरण या माध्यमातून महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले यामध्ये गावातील सर्व महिला पालक यांनी उपस्थिती दर्शवल या निमित्ताने या सुरक्षा माहिती व प्रत्यक्ष दाखविण्यात आले शिबिरा दरम्यान तज्ञ व्यक्तींचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. विविध गुणदर्शन, पथनाट्य, विद्यार्थी परिसरात इत्यादीचे आयोजन करण्यात आले होते.

## एन.सी.सी.

महाविद्यालयामध्ये एन.सी.सी. युनिट कार्यरत असून ते १६ महा. बटालियन सांगली यांचेशी सलग्न आहे. सन. २०२२-२३ मध्ये महाविद्यालयातील ३६ विध्यार्थी व १८ विध्यार्थिनी असे एकूण ५४ कॅडेटस एन.सी.सी. मध्ये प्रवेशित आहेत.

परीक्षा निकाल:

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षामधील 'बी' सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल १०० % तसेच 'सी' सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल ७७.७७ % आहे.

१. एन.सी.सी. प्रवेश:

दिनांक ०६/०९/२२ रोजी महाविद्यालयामध्ये सन २०२२-२३ करिता एन.सी.सी. प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया पार पडली. त्यासाठी १६ महाराष्ट्र बटालियनचे ऑफिसर व त्यांचा सर्व स्टाफ महाविद्यालयामध्ये उपस्थित राहून एन.सी.सी. प्रवेश प्रक्रिया सुरळीतपने पूर्ण केली.

२. एन.सी.सी. प्रशिक्षण:

प्रत्येक सोमवार व मंगळावर या दिवशी सकाळी १०.३० ते १२.३० वा. या वेळेत महाविद्यालयामध्ये नियमित एन.सी.सी. प्रशिक्षण सुरु होते.

३. विविध कॅम्पसाठी निवड व सहभाग:

अ) दि. ०१/०७/२२ ते १०/०७/२२ या कालावधी मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या 'TSCTSCTSC CAMP' साठी महाविध्यालयातील

०१ विध्यार्थिनीची निवड व सहभाग.

ब) दि. 23/०७/२२ ते ०१/०८/२२ या कालावधी मध्ये कोल्हापूर या ठिकाणी झालेल्या 'CATC' या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०६ विध्यार्थी सहभागी झाले होते.

क) दि. २०/०७/२२ ते २७/०७/२२ या कालावधी मध्ये कोल्हापूर येथे झालेल्या 'CATC' या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०१० विध्यार्थी व १० विध्यार्थिनीची निवड व सहभाग.

ड) दि. २६/०९/२२ ते ०१/१०/२२ या कालावधी मध्ये पुणे येथे झालेल्या 'AAC' या कॅम्प साठी महाविद्यालयातील ०३ विध्यार्थी व ०१ एन. सी. सी. ऑफिसर यांची निवड व सहभाग.

इ) दि. ०७/11/२२ ते १९/11/२२ या कालावधी मध्ये अहमदनगर येथे झालेल्या 'ARMY ATTACHMENT CAMP' या कॅम्पसाठी महाविद्यालयातील ०२ विध्यार्थ्यांची निवड व सहभाग.

ई) दि. ०६/०२/23 ते 13/०२/23 या कालावधी मध्ये सांगली येथे झालेल्या 'DAY CAMP' या कॅम्पसाठी महाविद्यालयातील ०१ विध्यार्थ्याची निवड व सहभाग.

४. रक्तदान शिबीर:

दि. ०५/०८/२२ रोजी महाविध्यालयामध्ये एन एस एस व एनसीसी विभागामार्फत रक्तदान शिबीर आयोजित केले होते.

५. आझादी का अमृत महोत्सव:

दि. 13/०८/२२ ते १५/०८/२२ या कालावधी मध्ये 'आझादी का अमृत महोत्सव' या योजने अंतर्गत 'हर घर तीरंगा' हा उपक्रम आयोजित केला होता. सदर उपक्रमामध्ये महाविद्यालयातील सर्व एन.सी.सी. कॅडेट सहभागी झाले होते.

६. स्वच्छता अभियान:

दि. 24/०९/२२ रोजी एन.सी.सी. विभागामार्फत महाविद्यालय परिसरामध्ये 'स्वच्छता अभियान' राबविण्यात आले.

७. एकता दिन: दि. ३१/१०/२२ रोजी एन.सी.सी. विभागामार्फत 'एकता दिन रॅली' आयोजित केली होती.

८. इतर: १५ ओगस्ट स्वातंत्र्य दिनी व २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी एन.सी.सी. विभागाकडून संचलन करणेत आले.

## विद्यार्थी कल्याण विभाग व अग्रणी महाविद्यालय

1) विद्यार्थी कल्याण विभागाअंतर्गत महाविद्यालयात समान संधी केंद्र स्थापन करण्यात आले. यात आठ मागासवर्गीय विद्यार्थी व एक शिक्षक तसेच प्रशासकीय सेवक यांची समिती स्थापन केली.
2) विद्यार्थी कल्याण विभाग व समान संधी केंद्रा मार्फत 26 नोव्हेंबर 2022 रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. मारुती शिरतोडे (जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक, पलूस) यांचे व्याख्यान झाले.
3) विद्यार्थी कल्याण विभागामार्फत महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थी- विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती तसेच रोजगाराच्या संधी या विषयावर डॉक्टर एस. एम. कांबळे सर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
4) अग्रणी महाविद्यालय अंतर्गत विद्यार्थी कल्याण विभागामार्फत दिनांक 11 एप्रिल 2023 रोजी रिसर्च डिझाईन, अर्थसंकल्प 2023 - 24 व सायबर क्राईम या तीन विषयावर कार्यशाळा संपन्न झाल्या. या कार्यशाळेसाठी डॉक्टर डॉ.पी.एम पाटील सर, डॉक्टर सदामते सर व प्राध्यापक संदीप पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उदघाटक म्हणून प्राचार्य, डॉक्टर दीपक देशपांडे (बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

5) अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आष्टा, कडेगाव, बोरगाव, व रामानंदनगर या महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न झाल्या. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले.

## पालक - शिक्षक संघ / हजेरी कमिटी

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पालक शिक्षक मेळावा बैठक २ वेळा घेण्यात आला. प्रथम सत्र हे १/८/२०२२ ते १५/१२/२०२२ या कालावधीत दिनाक १९/१२/२०२२ रोजी(सोमवार) सकाळी ११ वाजता घेण्यात आला. यावेळी बहुतांश पालक व महाविद्यालयातील शिक्षक उपस्थित होते. यावेळी पालक-शिक्षक मेळाव्याचा उद्देश व हेतू प्रा. डॉ. ए.एस. पाटील यांनी सुरुवातीला विशद स्पष्ट केला. यावेळी मा. प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रम, एन. एस. एस., एन. सी. सी., अविष्काकर, व्यावसायिक कोशल्या, महाविद्यालयातील शिस्त व महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या योजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. सौ. एस. पी. वाघ, प्रा. एस . एस. पाटील व प्रा. पी. एम. पाटील उपस्थित होते. प्रा. सौ. अवघडे मॅडम यांनी आभार व्यक्त केले.

तसेच द्वितीय सत्र २/१/२०२३ ते १७/६/२०२३ या कालावधीत सुरू आहे. या कालावधीत आर्ट्स, कॉमर्स व सायन्स विभागाचा दिनांक १३/४/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता ICT रूममध्ये शिक्षक-पालक मिळावा घेण्यात आला. यावेळी पालक-शिक्षक मेळाव्याचा उद्देश व हेतू प्रा. डॉ. ए.एस. पाटील यांनी सुरुवातीला विशद स्पष्ट केला. यावेळी उपस्थित पालकांना आपल्या पाल्याची उपस्थिती (हजेरी), त्याची मागील सत्रातील प्रगती (गुण) व त्यांना येणाऱ्या अभ्यासातील अडचणी व इतर समस्या याबाबत सविस्तर चर्चा झाली. यावेळी त्या त्या विभागातील शिक्षक उपस्थित होते. . यावेळी प्रा. सौ. एस. पी. वाघ, प्रा. एस . एस. पाटील व प्रा. पी. एम. पाटील उपस्थित होते. प्रा. सौ. अवघडे मॅडम यांनी आभार व्यक्त केले.

## नॅक

महाविद्यालयाचे नॅक संस्थेकडून 02 नोव्हेंबर 2018 रोजी पुर्नमूल्यांकन झालेले आहे. त्यामध्ये महाविद्यालयास बी. ही ग्रेड मिळालेली आहे. त्यानंतर प्रत्येक वर्षामधील अहवाल अेक्यूआर नॅक संस्थेकडे सर्व पूर्ततेसह ऑनलाईन सादर करण्यात आलेला आहे. व नॅक मूल्यांकनासंबधी यापुढील तयारी सुरू आहे. नोव्हेंबर 2023 मध्ये नॅकची मुदत संपुष्टात येत आहे.

## महिला वसतीगृह –

महाविद्यालयामध्ये महिला वसतीगृहाची सोय करण्यात आली असून यामध्ये पदवी व पदव्युत्तर वर्गाची विद्यार्थीनीची सोय करण्यात आली आहे.

## समारोप

ग्रामीण भागातील आपल्या या महाविद्यालयाचा उत्कर्ष होण्यासाठी या परिसरातील हितचिंतक, त्याचप्रमाणे माजी विद्यार्थी, विविध संस्था यांनी गुणी विद्यार्थ्यांच्यासाठी रोख बक्षीसे ठेवली आहेत अशा दानशूर व्यक्ती व प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या महाविद्यालयास सहकार्य करणा–या संस्था व व्यक्तीचे सहकार्य मिळत असते. खास बाब म्हणून मी नमूद करू इच्छितो की, पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सर्व संचालक व सदस्य तसेच लक्ष्मणराव किर्लोस्कर विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक, उपप्राचार्य, टेक्नीकल विभागप्रमुख , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत असते. या सर्वांचा व ज्ञात, अज्ञात सर्व हितचिंतकांचे आम्ही आभारी व सदैव ऋणी आहोत.

यापूढेही सर्वाचा कृपालाभ वृध्दीगंत व्हावा अशी इच्छा व्यक्त करून अहवाल पूर्ण करीत आहे.

जयहिंद जय महाराष्ट्र!

दिनांक : 30 जून 2023
ठिकाण : पलूस

डॉ. आर.एस. साळुंखे
प्राचार्य
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
पलूस, जि. सांगली.